# श्री लेमदेव पाटील महाविद्यालय मांढळ

## विभाग – अर्थशास्त्र


## प्रा. प्रकश बी. कटमूसरे


### बी.ए. भाग १ ( प्रथम सेम )

### सूक्ष्म अर्थशास्त्र - I

# अभ्यासक्रम
# युनिट १ : अर्थशास्त्राची ओळख

- वास्तववादी व आदर्शवादी अर्थाशात्र
- निगमन व आगमन पद्धती
- सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थूल अर्थशास्त्र
- आर्थिक नियम व निवडीची

# युनिट २ : मागणी व पुरवठ्याचा नियम

- मागणी व मागणीचा सिद्धांत
- मागनिची लवचिकता
- पुरवठा व पुरवठ्याचा नियम

# युनिट ३ : उपभोक्त्याची वर्तणूक

- उपयोगितेची वर्तणूक
- तटस्थता वक्र विश्लेषण
- उपभोगत्याचे आधिक्य किंवा संतोषाधीक्य व एंजलवक्र

# युनिट ४ : उत्पादन कार्य

- उत्पादनाचा अर्थ व संकल्पना
- उत्पादनाची साधने
- उत्पादनाचे प्रत्याय
- बदलत्या प्रमाणाचा नियम
- सम उत्पत्ती वक्राची संकल्पना
- उत्पादनातील मित व्ययता व बचती

# प्र. मार्शलच्या व्याख्याचे गुण व दोष लिहा?

- प्रो. मार्शलच्या व्याख्याचे गुण व दोष लिहा?
- प्रो. रॉबिन्स यांच्या व्याख्या स्पष्ट करून तिची परीक्षण करा?
- अँडम स्मिथने केलेली व्याख्या...... ह्या दृष्टीकोणावर आधारित आहे?
- मार्शल ह्यांनी दिलेल्या व्याख्येचे स्वरूप... कसे आहे.
- मानवी कल्याण हि संकल्पना मुळात... आहे.
- रॉबिन्सच्या व्याख्येचे वैशिष्टे (टिपणी लिहा).
- मार्शलच्या व्याख्येची वैशिष्टे (टिपणी लिहा).

# अर्थशास्त्राची व्याख्या व स्वरूप, व्याप्ती व परिणाम

- कोणत्याही शास्त्राचा अभ्यास करण्यापूर्वी त्या शास्त्राची व्याख्या करणे आवश्यक असते. व्याख्येमुळे त्या शास्त्राचा अभ्यास विषय, स्वरूप व व्याप्ती यांचा बोध होतो. आजपर्यंत अर्थाशास्त्राच्या अनेक व्याख्या केल्या असल्या तरी सर्व सामान्य अशी व्याख्या शोधुनही सापळत नाही.

# अर्थशास्त्राच्या व्याख्या

अर्थशास्त्राच्या ज्या निरोपाच्या व्याख्या करण्यात आल्या आहेत त्याचे, तिचे गटात वर्गीकरण करण्यात येते.

- संपत्तीच्या दृष्टिकोनावर आधारित व्याख्या
- कल्याणाच्या दृष्टिकोनावर आधारित व्याख्या
- दुर्मिळतेच्या दृष्टिकोनावर आधारित व्याख्या

# संपत्तीच्या दृष्टिकोनावर आधारित व्याख्या

- **अँडम स्मिथची व्याख्या (आधुनिक अर्थशास्त्राचे जनक) :**

"संपत्तीचे उत्पादन, वाटणी व विनिमय याचे विवेचन करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय."

**व्याख्येवरील आक्षेप , दोष , टीका.**

१) व्याख्येत संपत्तीला अवास्तव महत्व दिले.

२) संपत्तीच्या उपभोगाकडे दुर्लक्ष करण्यात आले.

३) आर्थिक मानवाची कल्पना गृहीत धरण्यात आली.

४) फक्त भौतिक वस्तुचाच समावेश केल्या गेला.

# कल्याणाच्या दृष्टीकोनावरून आधारित व्याख्या

- **डॉ. मार्शलची व्याख्या :**

संपत्ती हि केवळ साधन असून मानवी कल्यान हे साध्य आहे हा दृष्टीकोन ठेऊन डॉ. मार्शल यांनी अर्थशास्त्राची व्याख्या पुढील प्रमाणे केली.

“अर्थशास्त्र म्हणजे जीवनाच्या सामान्य धंद्यात गुंतलेल्या मानव समाजाचा अभ्यास आहे. ह्यात मानवी हिताच्या भौतिक साधनांची प्राप्ती व त्यांच्या उपयोग यांच्याशी अत्यंत निगडीत असलेल्या वैयक्तिक व सामाजीक प्रयत्नांचे विवेचन करण्यात येते. एका बाजूने तो संपत्तीचा अभ्यास तर दुसऱ्या व अधिक महत्वाच्या बाजूने तो मानवाच्या अभ्यासाचा एक भाग होय.”

# मार्शलच्या व्याख्येची प्रमुख वैशिष्टे

१) अर्थशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे.

२) सामान्य उद्धोगात गुंतलेला मानव

३) मानवी कल्याणाच्या विचार

४) मुद्रेत मापानिय प्रयत्न

# डॉ. मार्शलच्या व्याख्येवरील आक्षेप/दोष

- मार्शल ची व्याख्या निश्चित व काटेकोर नाही.
- ही व्याख्या अवास्तव व मोठी झाली आहे
- फक्त भौतीक कल्याणाचा विचार
- व्याख्या वर्गिकरण करणारी आहे विश्लेषण करणारी नाही
- मानवी कल्याण हि कल्पनाच मुळी संधीग्ध आहे

# रॉबिन्सची व्याख्या (दुर्मिळता दृष्टीकोन)

डॉ. मार्शल यांची व्याख्या सदोष वाढल्यामुळे ती प्रो.लीओनेल रॉबिन्स ह्यांनी त्याज्य ठरविली “The nature and significance of Economics Science” ह्या आपल्या ग्रंथात दुर्मिळतेच्या दृष्टीकोनावर आधारित असलेली अर्थशास्त्राची व्याख्या मांडली.

## व्याख्या :

साधने यांचा मेळ घालण्याच्या दृष्टीने केलेल्या मानवी व्यवहारांचा अभ्यास करणारे शास्त्र होय.”

# व्याख्येत पुढील तीन मुद्यावर भर दिला आहे

अ) साध्या म्हणजे मानवी गरजा असून त्या अनंत आहेत. तीव्रतेनुसार मानवी गरजांची क्रमवारी लावता येते.

ब) श्रम, वेळ , व पैसा इत्यादी मानवी गरजा पूर्ण करणारी साधने हि दुर्मिळ असतात. म्हणजेच मागणीच्या मानाने गरजा पूर्ण करणाऱ्या वस्तू दुर्मिळ असतात.

क) साधने ही विकल्याने विविध उपगोयात येतात. त्यामुळे या साधनांना आर्थीक महत्व प्राप्त होते.

अशा प्रकारे गरजा ह्या अनंत परंतु त्या पूर्ण करणारी साधने मात्र मर्यादित असल्यामुळे आर्थिक  प्रश्न निर्माण होतात. हाच अर्थशास्त्राचा अभ्यास विषय आहे असे रॉबिन्स ह्यांनी मांडले.

# रॉबिन्सच्या व्याख्येचे वैशिष्टे

१) व्याख्या सुटसुटीत व नेमक्या शब्दात

२) व्याख्या शास्त्रशुद्ध व दिज्ञानवादी

३) साध्य व साधने यांच्या बरेवाईट पणाला वाव नाही

४) व्याख्येत भौतिक व अभौतिक साधनांन वाव

५) विशिष्ट प्रकारच्या मानवी वागणुकीचा अभ्यास होत नसून आर्थिक बाजू तपासली जाते.

# रॉबिन्सच्या व्याख्येचे दोष/आक्षेप :

१) व्याखेमुळे अर्थशास्त्राची व्याप्ती बरीच कमी होते.

२) व्याख्येत नैतिक दृष्टीकोन आढळत नाही

३) अर्थशास्त्र शुद्ध विज्ञानवादी शास्त्र नसून ज्ञानदायी व फलदायी शास्त्र आहे.

४) आर्थिक प्रश्न फक्त दुर्मिळमुळे निर्माण होतात असे नाही

# मागणी व मागणीचा सिद्धांत :

## प्रस्तावना व व्याख्या :

ज्या वस्तूच्या किंमती वाढतात त्या वस्तू आपण कमी प्रमाणात खरेदी करतो आपला नेहमीचा अनुभव आहे. हा प्रत्येकाला नेहमी येणारा अनुभव डॉ. आल्फ्रेड मार्शल यांनी पुढील प्रमाणे मांडला आहे. व हा मागणी नियम किंवा मागणी सिद्धांत म्हणून ओळखला जातो.

## व्याख्या :

"विशिष्ट परिस्थितीत वस्तूची किंमत उतरली तर त्या वस्तू करिता असणारी मागणी वाढते व किंमतीत वाढ झाल्यास त्या वस्तू करिता असणारी मागणी कमी होते."

# उदा.

किंमतींच्या व्यस्त दिशेने मागणी बदलते अशा प्रकारे मागणी सिद्धांत थोडक्यात सांगता येईल. पुढील उदाहरणावरून मागणी सिद्धांत स्पष्ट होतो.


## उदा.

| वस्तूची किंमत | व्यक्तीची मागणी | बाजारपेठेची मागणी |
|---|---|---|
| ५ रु. डझन | २ डझन | २,००० डझन |
| ४ रु. डझन | ४ डझन | ४,००० डझन |
| ३ रु. डझन | ६ डझन | ६,००० डझन |
| २ रु. डझन | ९ डझन | ९,००० डझन |

जसजसी वस्तूची किंमत कमी होत जाईल तसतसी व्यक्ती व बाजारपेठेची मागणी वाढत जाईल या उलट किंमत वाढल्यास मागणी कमी होईल.

# आकृतीच्या सहाय्याने स्पष्टीकरण :

- मागणी सिद्धांताची आकृती :



# मागणीचा नियम अनुभवाला येण्याची कारणे :

१) विविध उपयोगीतेचे तत्व

२) गरजेची तीव्रता

३) उत्पन्नातील विषमता

४) प्रतीस्तापन परिणाम

# मागणीचा बदल होण्याची कारणे :

किंमतीतील बदलामुळे मागणीत बदल होतो. तरीपण किंमती शिवाय इतर घटकांमुळे मागणीत बदल होत असतो किंमत स्थिर असून सुद्धा इतर घटकात बदल झाल्यास मागणीत बदल होत असतो.

१) लोकसंखेतील बदल

२) उत्पन्नातील बदल

३) हवामानातील बदल

४) उपभोक्त्याच्या आवडी निवडीत बदल

५) सामाजिक चाली रितीत बदल

६) उपयोगीतेत वाढ

७) मुद्रेच्या साठ्यात वाढ

८) संपत्तीच्या वाटणीत बदल

९) पर्यायी व पूरक वस्तूच्या किंमतीत बदल

१०) जाहिरात व विक्रीव्यय

११) भविष्यकालीन किंमत